**पोलीस आयुक्त,**
**पिंपरी चिंचवड यांचे कार्यालय.**
**प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे-४११०३३.**

## प्रेसनोट

## माहे जानेवारी २०२३ या एकाच महिन्यात ११० गुन्हेगारांच्या मोका अंतर्गत कारवाई करून मुसक्या आवळण्यात आल्या

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतील संघटीत गुन्हेगारी टोळ्यांचे गुन्हेगारी कारवायांवर नियंत्रण ठेवण्यासाठी व त्यांचेवर प्रभावी कारवाई करण्यासाठी व पोलीस आयुक्त श्री. विनय कुमार चौबे, यांची परिणामकारक कारवाई.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयामध्ये संघटीत गुन्हेगारी टोळ्यांमधील बेकायदेशीर कृत्ये करणाऱ्यांवर जरब बसविणेसाठी सर्व पोलीस ठाणे, प्रभारी अधिकारी यांना मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे, सह पोलीस आयुक्त श्री. मनोज लोहिया व अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे यांनी सक्त सुचना दिलेल्या होत्या. त्या अनुषंगाने मागील काही दिवसांमध्ये गुन्हेगारी टोळ्यांचे रेकॉर्ड अद्यावत करून त्यांचेवर विविध पोलीस ठाणेंकडून व गुन्हे शाखेकडून आढावा घेवून त्यांचेवर कशा प्रकारे कारवाई करण्यात याचा विचार करून त्यांचेवर मोका कायद्या अंतर्गत कारवाई करण्याचे ०७ प्रस्ताव सादर करण्यात आले होते. त्यावर पोलीस उप-आयुक्त, यांच्या अभिप्राया नंतर अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे यांनी सदर टोळ्यांवर दाखल असलेल्या ०७ गुन्ह्यांमध्ये मोका कायद्याच्या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत करण्यात आले असून एकुण ११० गुन्हेगारांवर मोका कायद्यांतर्गत कारवाई करून मुसक्या आवळण्यात आल्या आहेत व ०१ गुन्हेगारावर एम.पी.डी.ए. अंतर्गत कारवाई करून कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.

**मोका कारवाई करण्यात आलेल्या टोळ्यांची माहिती.**

(१) **चिंचवड पोलीस ठाणे :-** अनिल तुकाराम मोहिते, **व इतर १०**
(२) **हिंजवडी पोलीस ठाणे :-** हिरा बहादुर हमाल **व इतर ०७**
(३) **चाकण पोलीस ठाणे :-** शुभम सुरेश म्हस्के **व इतर १७**
(४) **निगडी पोलीस ठाणे :-** दत्ता बाबु सुर्यवंशी **व इतर ०३**
(५) **चिंचवड पोलीस ठाणे :-** आकाश राजू काळे **व इतर ०६**
(६) **पिंपरी पोलीस ठाणे :-** विशाल विष्णू लष्करे **व इतर ३०**
(७) **तळेगांव दाभाडे पोलीस ठाणे :-** कुणाल धिरज ठाकुर व इतर २९

**तसेच**
(१)**निगडी पोलीस ठाणे :-** अक्षय मुकुंद गायकवाड यास एम.पी.डी.ए. अंतर्गत स्थानबध्द करण्यात आले आहे.

**( स्वप्ना गोरे )**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे),
पिंपरी चिंचवड.